# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

आजादी का अमृत महोत्सवा' निमित्त मुं.मे.रे.कॉ.मध्ये राष्ट्रगानाचे सामूहिक गायन

मुंबई, १३ ऑगस्ट, २०२१ - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ)चे व्यवस्थापकीय संचालक श्री रणजीत सिंह देओल यांच्या नेतृत्वाखाली आज भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित आजादी का अमृत महोत्सवास प्रारंभ झाला.

भारताचा गौरवशाली इतिहास, संस्कृती, कर्तृत्व आणि स्वातंत्र्य सैनिकांचे बलिदान यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने भारत सरकारद्वारे आजादी का अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. माननीय पंतप्रधानांनी सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी या उपक्रमात डिजिटल माध्यमातून सहभाग घ्यावा आणि राष्ट्रगान गायनाचा व्हिडिओ रेकॉर्ड करावा.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे (मुं.मे.रे.कॉ) मुख्यालय आणि हॉलमार्क प्लाझा कार्यालयमध्ये सामूहिक राष्ट्रगान गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कोविड -१९ च्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून मुं.मे.रे.कॉच्या सर्व कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात भाग घेतला.

यावेळी संचालक (प्रकल्प) श्री. एस.के. गुप्ता, संचालक (प्रणाली) श्री. ए.ए. भट्ट, संचालक (वित्त) श्री. अबोध खंडेलवाल, कार्यकारी संचालक (नियोजन) श्री. आर. रमणा, कार्यकारी संचालक (रोलिंग स्टॉक) श्री. राजीव आणि कार्यकारी संचालक (सिग्नल अँड टेलिकॉम) श्री. राजीव कुमार आणि मुं.मे.रे.कॉचे अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/ 9664215544
niti.tamse@mmrcl.com